# प्रेसनोट

नाशिक,
दि. ०९/०५/२०२४

**आलोसे क्र.१. आरती मृणाल आळे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार.- सहायक संचालक पुरातत्व विभाग, नाशिक व आलोसे क्र २.तेजस मदन गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालय यांचे संचानालय, महाराष्ट्र राज्य,मुंबइ यांनी १५००००/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्यान्वये कारवाई केले बाबत.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक |
| गुन्हा नोंद क्रमांक | इंदिरानगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर, गु.र.नं.१४५/२०२४ |
| कलम | भ्र.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, ७(अ) व १२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | १) आरती मृणाल आळे, वय- ४१ वर्षे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार.- सहायक संचालक पुरातत्व विभाग, नाशिक<br>२) तेजस मदन गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तु संग्रहालय यांचे संचानालय, महाराष्ट्र राज्य,मुंबइ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १५००००/-रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १५००००/-रुपये |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांना आशेवाडी, ता.दिंडोरी, रामशेज किल्ल्याजवळ ११ वर्षाकरीता कराराने एव्हरग्रीन कंपनी टाकण्याकरीता लागणारे ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे मोबदल्यात आलोसे क्र १ आरती मृणाल आळे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार - सहायक संचालक पुरातत्व विभाग, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडे १५००००/- रू लाचेची मागणी केल्याने तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक कार्यालयात तक्रार दिली.<br>सदर तक्रारीवरुन ला.प्र.वि. नाशिक पथकाने पडताळणी करून सापळा आयोजित केला असता सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र १ आरती मृणाल आळे, तंत्र सहायक, अतिरिक्त कार्यभार - सहायक संचालक पुरातत्व विभाग, नाशिक यांनी तक्रारदार यांचे कडुन १५००००/- रू लाचेची मागणी करून सदर लाचेची रक्कम दि.०७.५.२०२४ रोजी स्विकारली व आलोसे क्र २ तेजस मदन गर्गे, संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी आलोसे आरती आळे यांना लाच स्विकारण्यास प्रोत्साहन दिले म्हणुन दोघांविरूद्ध इंदिरानगर पोलीस स्टेशन, नाशिक शहर गु.र.नं. १४५/२०२४ भ्र.प्र.का. सन १९८८ चे कलम ७, ७(अ) व १२ प्रमाणे दि.०८.०५. २०२४ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक येथे संपर्क करावा.


संपर्क पत्ता :- ला.प्र.वि. नाशिक परिक्षेत्र, नाशिक
संकेतस्थळ :- acbmaharashtra.gov.in
ई-मेल :- spacbnashik@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार :- acbmaharashtra.net
टोल फ्री क्रमांक :- १०६४
दुरध्वनी क्रमांक :- ०२५३-२५७५६२८, २५७८२३०
व्हॉट्स ॲपक्र :- ९९३०९९७७००


( नरेंद्र भा.पवार )
पोलीस उपअधीक्षक ( वाचक )
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नाशिक परिक्षेत्र, नाशिक